ePaper

# “नरेंद्र मोदींना पुन्हा संधी देणं धोकादायक:शरद पवार!




‖ वर्ष - 7 । अंक - 339 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- काव्या मारनला राग अनावर
- जिजाजींना नाही आणलं का?
- दुसऱ्या टप्प्यात 64.70 टक्के मतदान!
- सरकार फडणवीसांना अटक करणार?



www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 27 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## महाविकास आघाडीच्या संजोग वाघेरेंचा ‘सॉफ्ट’ स्वभाव

# महायुतीच्या बारणेंसाठी निवडणूक ‘हार्ड’!

## लोकसभा निवडणूक : मावळात वाघेरे यांची मतदारांशी ‘कनेक्टिव्हिटी’ तुलनेत जास्त

**। पिंपरी। महाईन्यूज। विशेष प्रतिनिधी**

**लोकांसोबत सहजतेने सुसंवाद साधत ‘कनेक्टिव्हिटी’ जोडण्यात महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यशस्वी होताना दिसत आहेत. वाघेरेंचा हा ‘सॉफ्ट’ चेहरा विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांच्यासाठी अडचणीचा ठरत आहे. खासदार बारणे यांना यंदाची निवडणूक ‘हार्ड’ असल्याचे राजकीय चित्र आहे. खा. बारणेंच्या प्रचार सभांना लोकांचा कमी होणारा प्रतिसाद, महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये असणारी उदासीनता यावरून हे वास्तव अधोरेखित होत आहे.**




गेल्या लोकसभा निवडणुकीवेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचा पराभव करणाऱ्या खासदार श्रीरंग बारणे यांचे नाव देशभरात चर्चेत आले होते. भाजपा शिवसेना महायुतीचे उमेदवार म्हणून खासदार बारणे लढले होते. तेव्हा शिवसेनेत फूट पडली नव्हती. त्याचा फायदा खासदार बारणे यांना झाला. मात्र कालांतराने राज्यभरातली राजकीय परिस्थिती बदलली. त्यामध्ये खासदार बारणे यांनी त्या राजकीय भूमिकेनुसार आपली राजकीय चाल खेळली. मात्र ही चाल त्यांच्या अंगलट आल्याचे दिसत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात खासदार बारणे देखील सत्तेत सामील झाले आहेत. मात्र, त्यामुळे मावळ लोकसभेत त्यांची चांगलीच राजकीय गोची झाल्याचे पाहायला मिळत आहे.

खासदार बारणे यांना पहिल्या टप्प्यातच उमेदवारीसाठी झगडावे लागल्याचे मतदारसंघाने पाहिले. उमेदवारी मिळेल की नाही ? मतदार संघ कोणत्या पक्षाला सोडला जाईल ? भाजपामधून तसेच राष्ट्रवादी मधून वाढता विरोध ही सर्व परिस्थिती हाताळत अखेरच्या टप्प्यात बारणे यांना तिकीट जाहीर झाले. त्यांना तिकीट मिळाले असले तरी या मतदारसंघात चाललेल्या राजकीय नाट्यमय परिस्थितीमुळे महायुतीच्या राजकीय “इमेज ब्रँडिंग” मध्ये नकारात्मक स्थिती निर्माण झाली. त्याचा फायदा महाविकास आघाडीने घेतला.

महाविकास आघाडी मधील उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात असलेल्या शिवसेनेत निर्माण झालेली राजकीय ‘स्पेस’ हेरत माजी महापौर संजोग वाघेरे यांनी ती जागा घेतली.




उपमुख्यमंत्री अजित पवार यांची साथ सोडत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली वाघेरे शिवसेनेत दाखल झाले. त्यांना पहिल्याच टप्प्यात उमेदवारी जाहीर झाली. त्याचा परिणाम म्हणून महाविकास आघाडीने अगोदरपासूनच प्रचाराचे रान उठवले. वाघेरे यांचे खासदार बारणे यांच्या तुलनेत जनतेशी सहज सुसंवाद साधण्याची कसब आहे. लोकांमध्ये मिसळून ते संवाद साधत आहेत. त्यांची क्लीन इमेज त्यांना फायदेशीर ठरत आहे. मावळ लोकसभेत त्यांची मोठी नातीगोती आहेत. या बरोबरच खासदार शरद पवार माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या बबत असणारी सहानुभूती वाघेरे यांना फायद्याची ठरत आहे. त्यामुळे मावळ लोकसभेत खासदार बारणे यांना फटका बसू शकतो, अशी राजकीय चर्चा होत आहे.

### ... हा तर श्रीरंग बारणेंचा रडीचा डाव : संजोग वाघेरे

मावळमध्ये ‘संजय वाघेरे’ आणि ‘संजोग पाटील’ नावाच्या दोन व्यक्तींनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्या नावात आणि अपक्ष दोन्ही उमेदवाराच्या नावांमध्ये काही प्रमाणात साधर्म्य आहे, यातून मतांची विभागणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावरून, संजोग वाघेरेंनी श्रीरंग बारणेंवर टीका केली आहे. संजोग वाघेरे म्हणाले की, श्रीरंग बारणे यांना पराभव दिसत असल्याने ते रडीचा डाव खेळत आहेत. यातून बारणे यांचा बलिशपणा दिसतो आहे.

### पक्ष बदलण्याचा बारणे यांना तोटा ?

वेगवेगळ्या पक्षात जाऊन तिकीट मिळवत आपला राजकीय आलेख वाढवण्याचे कसब खासदार श्रीरंग बारणे यांना जमले असल्याचे अनेक राजकीय जाणकार सांगतात. पूर्वी काँग्रेस मधून ते नगरसेवक झाले. नंतरच्या काळात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत दोन वेळा खासदार झाले. शिवसेनेच्या फुटी नंतर ठाकरेंची साथ सोडत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व त्यांनी स्वीकारले. मावळ लोकसभेत भाजपाकडून कमळावर लढण्याचे त्यांनी प्रयत्न केल्याची चर्चा आहे. खासदार बारणे यांच्या या बदलत्या राजकीय भूमिकेचा एका बाजूला त्यांना फायदा झाला असला तरी यंदा मात्र त्यांना याचा मोठा फटका बसताना दिसत आहे. त्यांच्या प्रति इतर पक्षातील निष्ठावंतांची नाराजी मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याचे दिसत आहे. त्याचा परिणाम यंदाच्या निवडणुकीत स्पष्ट दिसेल अशी परिस्थिती आहे.

# नागरिकांशी थेट ‘कनेक्टिव्हिटी’

# महायुतीचे आढळराव पाटील यांची ‘बारी सुसाट’!

## लोकसभा निवडणूक : मावळात वाघेरे यांची मतदारांशी ‘कनेक्टिव्हिटी’ तुलनेत जास्त

। पुणे। महाईन्यूज। विशेष प्रतिनिधी

**गेल्या पाच वर्षात निवडणुकीत पराभूत झाल्यानंतरही लोकांशी कनेक्ट राहिल्यामुळे त्याचा फायदा सध्याच्या निवडणुकीत माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना होताना दिसत आहे. विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या तुलनेत आढळराव पाटील संपर्कात आघाडीवर आहेत. त्यामुळे संपर्कात राहणारा खासदार कोण याबाबत मतदारांमध्ये चर्चा रंगताना कोल्हे मात्र पिछाडीवर पडत असल्याचे दिसते.**



लोकसभा निवडणुकीचे दोन टप्पे पार पडले आहेत. तिसऱ्या टप्प्यात शिरूर लोकसभेचे मतदान होणार आहे. सध्या प्रचाराला रंग चढू लागला आहे. राज्यातील आणि देशातील नेत्यांच्या प्रचार तोफा देखील धडाडत आहेत. सभांमधून उमेदवारांच्या तुलना होताना दिसत आहे. त्याचाच प्रत्यय शिरूर लोकसभा मतदारसंघात देखील येताना दिसत आहे. या मतदारसंघात संपर्कात कोण कमी अथवा जास्त आहे, यावर अधिक भर दिला असल्याचे दिसत आहे. विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे गेल्या पाच वर्षात मतदारांसोबत संपर्क ठेवण्यात कमी पडल्याचे राजकीय वास्तव आहे. ही खंत राष्ट्रवादीच्या फुटी पूर्वी त्यांच्याच पक्षातील पदाधिकारी, नेते आणि कार्यकर्ते व्यक्त करत होते. त्यामुळे कोल्हे यांचे राजकीय वजन देखील खालावल्याची चर्चा होती. सध्याच्या प्रचारात देखील मतदारांमधून हाच प्रश्न उपस्थित केल्याचे पाहायला मिळत आहे. त्याला उत्तर देताना लोकसभेत प्रश्न मांडणारा मी खासदार असल्याचे कोल्हे सांगत असले तरी हा राजकीय प्रोपोगंडा मतदार संघात फिट होताना दिसत नाही.

याउलट पराभूत झाल्यापासून माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे सतत लोकांमध्ये मिसळत राहिले. विविध सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय दिसले. कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी चालूच ठेवल्या. प्रशासकीय पातळीवर अधिकाऱ्यांकडे भेटी

ग्राउंड रिपोर्ट

घेऊन रखडलेले प्रश्न मांडत होते. भविष्यातील राजकीय चित्र काय असेल याबाबत साशंकता असताना देखील त्यांनी आपले काम चालूच ठेवल्याचे दिसत होते. त्यामुळे अमोल कोल्हे यांच्या विरोधात सक्षम उमेदवार म्हणून माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचेच नाव राजकीय जाणकारांच्या मधून देखील चर्चेत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला ही जागा सोडल्यानंतर त्यांनी देखील आढळराव पाटील यांच्याच नावाला पसंती दिली. त्यावरून आढळराव पाटील यांची जनतेसोबतची कनेक्टिव्हिटी स्पष्ट होते. पराभूत होऊनही लोकांच्या सोबत संपर्क ठेवण्याचा फायदा आढळराव यांना सध्याचा राजकीय प्रोपोगंडा राबवताना फायद्याचा ठरत असल्याचे बोलले जात आहे.

### महायुतीचा आढळरावांना फायदा..!

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार म्हणून खासदार शिवाजीराव आढळराव पाटील उभे आहेत. त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिवसेनेची देखील साथ आहे. तर महायुतीतील मित्र पक्षा ची मैत्री जपण्यासाठी भाजपाने देखील चंग बांधला असल्याने त्याचा फायदा आढळराव पाटील यांना होईल अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. तर दुसरीकडे खासदार अमोल कोल्हे यांना मात्र खासदार शरद पवार यांच्या नावाचा वापर करूनच निवडणुकीला सामोरे जाण्याची वेळ आली आहे.

# पुणेकरांनी कालच निकाल दाखवून दिला!

## पत्रकार परिषदेत रुपाली चाकणकर यांचे प्रतिपादन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळांनी काल पुण्यात मोठं शक्तिप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्री चंद्रकांत पाटील आणि महायुतीचे सर्वच कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. त्याच पार्श्वभूमीवर आज अजित पवार गटातील महिला प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकरांनी पुण्यात पत्रकार परिषद घेतली.**



यावेळी रूपाली चाकणकर म्हणाल्या की, पुणे लोकसभेच्या बाबतीत मुरलीधर मोहोळ यांनी आपला काल उमेदवारी अर्ज भरला. त्यावेळी मुरलीधर मोहोळ यांच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या वेळी प्रचंड गर्दी दिसून आली. या गर्दीवरूनच लक्षात येते की पुणेकर किती उत्साही आहेत. फारसा पुणेकर कुणाला डोक्यावर घेत नाही. परंतु काल मुरलीधर मोहोळ यांनी जे काही काम केलं आहे. त्या कामाची उतराई म्हणून खऱ्या अर्थाने इतक्या उन्हामध्ये सुद्धा पुणेकर रस्त्यावर उतरलेला होता. त्यामुळे पुण्याची निवडणूक ही पुणेकरांनी आता हातात घेतली आहे. त्याच्यामुळे फॉर्म भरणे ही औपचारिकता असून मुरलीधर मोहोळ यांनी केलेली विकासकामांमुळे पुणेकरांनी कालच निकाल दाखवून दिला आहे.

### 50 हजार कोटींची कामे केली जाणार

दरम्यान, त्याआधी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर मुरलीधर मोहोळ यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, पुण्याच्या पुढील ५० वर्षाचा विचार करून शहरात केंद्र व राज्य सरकारच्या मदतीने कामे सुरू केली आहेत. पुणे देशातील प्रथम क्रमांकाचे शहर व्हावे. नागरिकांचे जीवनमान उंचवावे, यासाठी पुढील काळात पुणे शहर आणि परिसरात ५० हजार कोटींची कामे केली जाणार आहेत. शिक्षणाच्या आणखी चांगल्या संधी निर्माण होणे, नवीन उद्योग आणणे, रोजगारनिर्मिती करणे, पायाभुत सुविधा निर्माण करणे यासाठी ही निवडणुक लढवत असून पुणेकर मला नक्की विजयी करतील असा विश्वास मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला.

# शिवाजीनगर हिंजवडी मेट्रोमुळे वाहतुकीचा सक्षम पर्याय उपलब्ध!

## पुणे लोकसभा भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला विश्वास

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आयटी हब असलेल्या हिंजवडीला शहराच्या मध्यवर्ती भागाशी जोडणारा शिवाजीनगर ते हिंजवडी हा मेट्रो प्रकल्प अतिशय महत्त्वाकांक्षी असून, त्यामुळे नागरिकांना वेगवान, सक्षम सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय मिळणार असल्याचा विश्वास पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले.**



शिवाजीनगर गावठाण परिसरात आयोजित केलेल्या प्रचार फेरीच्या सांगता सभेत ते बोलत होते. आमदार सिद्धार्थ शिरोळे, दत्ता खाडे, आदित्य माळवे, रविंद्र साळेगावकर, सुनील पांडे, गणेश बगाडे, किरण ओरसे, डॉ. अजय दुधाने, हेमंत डाबी, अपर्णा कुऱ्हाडे, सचिन वाडेकर, सचिन मानवतकर, दयानंद इरकल, आकाश रेणुसे, संजय तुरेकर यांचा प्रचार फेरीत प्रमुख सहभाग होता.

मोहोळ म्हणाले, पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणामार्फत पीएमआरडीए सार्वजनिक खासगी भागीदारीतून हा प्रकल्प साकारला जात आहे. या प्रकल्पाची एकूण लांबी 23.3 किलोमीटर असून या मार्गावर स्थानकांची संख्या 23 इतकी आहे. हिंजवडी, वाकड, बालेवाडी, बाणेर, औफ्लध, गणेशखिंड, खैरेवाडी, शिवाजीनगर आदी भागांना एकमेकांशी जोडणारा हा प्रकल्प आहे. भविष्यात हडपसर व लोणी काळभोरपर्यंत विस्ताराची योजना आहे.

सध्या प्रकल्पाचे 55 टक्के काम पूर्ण झाले असून, मे 2025 पर्यंत प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करणार आहे.

### ज्ञानेश्वर पादुका चौकात प्रचार फेरीची सांगता

» गावठाणातील रोकडोबा मंदिरापासून प्रचार फेरीचा प्रारंभ झाला. परिसरातील गणेश मंडळे आणि सामाजिक संस्थांनी उत्साहात स्वागत केले. ठिकठिकाणी महिलांनी औक्षण केले. शिवाजीनगर गावठाण, राष्ट्रवादी भवन, तोफखाना, जंगली महाराज रस्ता, गोखले स्मारक चौक, फर्ग्युसन कॉलेज रस्तामार्गे ज्ञानेश्वर पादुका चौकात प्रचार फेरीची सांगता झाली.

# मोदींचे हात बळकट करण्यासाठी "नमो संवाद"

## भोसरी विधानसभा मतदार संघात ठिकठिकाणी बैठका

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'बलशाली भारताचे' स्वप्न साकार करण्यासाठी पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदी विराजमान केले पाहिजे. "शेवटच्या घटकाचा विकास..." हाच भाजपा महायुतीचा नारा असून, सर्वसामान्य जनता महायुतीच्या उमेदवारांच्या पाठीशी राहील, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.**

### भाजपा आमदार महेश लांडगे यांचा नियोजनबद्ध प्रचार



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १० वर्षांच्या यशस्वी वाटचालीतील महत्त्वपूर्ण निर्णय, महत्त्वाकांक्षी प्रकल्प आणि कल्याणकारी योजना याची माहिति तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून "नमो संवाद" उपक्रम सुरू करण्यात आला आहे.


भाजपा सांस्कृतिक प्रकोष्ठच्या प्रदेशाध्यक्षा प्रिया बेर्डे यांच्या नेतृत्त्वाखाली भोसरी विधानसभा मतदार संघात आतापर्यंत २० ठिकाणी 'नमो संवाद' कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विधानसभा निवडणूक प्रमुख विकास डोळस, बूथ प्रमुख, मंडल प्रमुख आणि शक्तीकेंद्र प्रमुख उपस्थित होते.

दिघी, चऱ्होली, मोशी जाधववाडी, गंधर्व नगरी आदी परिसरात या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तसेच, शिरूर लोकसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना प्रचंड मताधिक्यांनी विजयी

> **महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी "नमो संवाद" हा उपक्रम घेण्यात आला आहे. बूथ प्रमुख ते मतदार यांच्यापर्यंत भाजपा महायुतीचा विचार आणि कार्य पोहोचवण्याचा निर्धार असून, या माध्यमातून 'अबकी बार ४०० पार" चा नारा यशस्वी करण्याचा संकल्प आहे. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**
>
> – प्रिया बेर्डे, प्रदेशाध्यक्षा, सांस्कृतिक प्रकोष्ठ, भाजपा.

> **'नमो संवाद'च्या माध्यमातून गेल्या १० वर्षात लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या माध्यमातून राबविलेल्या विविध योजना व महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्प तसेच, देशाच्या हिताच्या दृष्टीने घेण्यात आलेले महत्वपूर्ण निर्णय याची माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे.**
>
> – महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

# नालेसफाईची कामे मे अखेर पर्यंत पूर्ण करा; आयुक्तांचे निर्देश



। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थिती उद्भवणार नाही ( PCMC ) यासाठी शहरातील नालेसफाई व पावसाळी गटर्स सफाईची सर्व कामे मे अखेर पर्यंत पूर्ण करावीत. तसेच संभाव्य पूरपरिस्थितीत कोणतीही घटना घडल्यास संबधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून सर्व विभागांनी समन्वयाने परिस्थिती हाताळावी, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी अधिकाऱ्यांना दिले. महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली मान्सूनपूर्व तयारी तसेच आपत्ती व्यवस्थापन उपाययोजनांसंबधी आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पावसाळ्यात उद्भवणाऱ्या विविध समस्या तसेच आपत्कालीन परिस्थिती याबाबत सर्वंकष चर्चा करण्यात आली. तसेच त्या अनुषंगाने विविध विभागांकडे सोपविण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा आणि नियोजन याबद्दल माहिती घेण्यात आली. त्यावेळी आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिका-यांना कामकाजाबाबत आदेश दिले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता रामदास तांबे, श्रीकांत सवणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले, ज्ञानदेव जुंधारे, राजेश आगळे, उमेश ढाकणे, सीताराम बहुरे, कार्यकारी अभियंता देवन्ना गट्टूवार, बापूसाहेब गायकवाड, सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे यांच्यासह संबधित अधिकारी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी आता आत्मनिर्भर व्हावे..!




**यावर्षी हवामान परिस्थितीचा आढावा घेता यंदा प्रत्येक महिन्यात अवकाळी पाऊस पडला. याचा अर्थ हंगामी किंवा हवा त्यावेळी पिकाला उपयुक्त ठरणारा पाऊस झाला नाही, पण नको तेव्हा मात्र भरपूर पाऊस झाला आहे. ताजे उदाहरण हेच दर्शवते. दुसरीकडे, राज्यातील काही भाग उन्हाने पोळून निघतो आहे. पाणीप्रश्न गंभीर बनत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी काही उपाय अनुसरावे लागतील.**

जगामध्ये पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाने खळबळ माजवली नव्हती, तेवढी पर्यावरणातील असंतुलनामुळे सध्या माजली आहे. मध्यंतरीच्या काळात जपानमध्ये टोकियो, ब्राझील आणि पॅरिसमध्ये संपूर्ण जगाने एकवटून पर्यावरण रक्षणाचा ध्यास घेतला. मोठमोठ्या परिषदा झाल्या, त्यात अनेक ठराव झाले आणि जगातील प्रदूषण दूर होईल, अशी आशा निर्माण झाली; परंतु पॅरिस येथील परिषदेमध्ये ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष असताना त्यांनी या परिषदेतून आणि एकूणच पर्यावरण चळवळीतून अंग काढून घेतले. त्यामुळे अमेरिकेसारखा बलाढ्य देश पर्यावरण चळवळीचा गांभीर्याने विचार करत नसेल, तर इतर देशांची परिस्थिती काय होईल, हा विचार करायला हवा. साहजिकच नंतर ही चळवळ थंडावली. पण पर्यावरणाचा ऱ्हास मात्र अपेक्षेपेक्षा जास्त तीव्रतेने होण्यास आता सुरुवात झाली आहे. सध्या



भारतात जाणवणारा तीव्र उन्हाळा किंवा दुष्काळसदृश परिस्थिती पर्यावरणातील असंतुलनाचे दुष्परिणाम असल्याचे सर्वसामान्य माणसाला कळून चुकले आहे. यावर सांगितले जाणारे उपाय म्हणजे कार्बन प्रदूषण कमी करणे, त्यासाठी पेट्रोल व डिझेलवरील वाहनांऐवजी वीज आणि इथेनॉलवर चालणाऱ्या वाहनांना प्राधान्य देणे आणि वनराईखाली भरपूर क्षेत्र आणणे.

एकीकडे अमेरिका पर्यावरण चळवळीतून बाहेर पडते, तर दुसरीकडे तेथीलच अल गोर यांना पर्यावरण चळवळीला प्रोत्साहन दिल्याबद्दल नोबेल पुरस्कार दिला जातो, ही अमेरिकेच्या धोरणातील विसंगता गरीब देशांना जास्त जाचक ठरू लागली आहे. भारत हा त्यापैकीच एक देश आहे. सर्व जगाने एकवटून या संकटाचा सामना न केल्यास आज आपल्याकडील अनेक शहरांमध्ये एप्रिल महिन्यातच तापमान ४० अंशांच्या पुढे गेले आहे, हे लक्षण आणि अवेळी पाऊस पडण्याची स्थिती तसेच त्यापोटी काढणीला आलेल्या पिकांचे झालेले नुकसान हे दोन्ही फटके पर्यावरणातील असंतुलनामुळे निर्माण झाले आहेत.

भारतात स्वातंत्र्यानंतर वने लागवडीसाठी सरकारी स्तरावर जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला. झाडे लावण्यासाठी रेकॉर्डवर भारताच्या क्षेत्रफळापेक्षा जास्त क्षेत्रफळाचे खड्डे तयार झाले; परंतु झाडे मात्र लागली नाहीत आणि लागलेली जगलीही नाहीत. आता तर भारतात ही चळवळ पूर्णपणे थंडावली आहे. त्यातील भ्रष्टाचार लक्षात आल्यामुळे आता या प्रश्नी हात घालण्यास कोणीही तयार नाही. या वर्षीच्या हवामान स्थितीचा आढावा घेता लक्षात येते की, प्रत्येक महिन्यात अवकाळी पाऊस पडला आहे. याचा अर्थ हंगामी पाऊस झाला नाही, हवा त्यावेळी पिकाला उपयुक्त ठरणारा पाऊस झाला नाही, पण नको तेव्हा भरपूर पाऊस झाला आहे. आताचे ताजे उदाहरण हेच दर्शवते. अलीकडेच विदर्भ आणि मराठवाड्यात गारपीट झाली आणि काढणीस आलेली पिके जमीनदोस्त झाली. असे प्रत्येक महिन्यात घडत आले आहे. याचा फटका शेतकऱ्यांनाच बसला आहे. सरकार प्रत्येक महिन्यात नुकसानीचे पंचनामे करा, मदत दिली जाईल, मदतीची रक्कम शेतकऱ्यांची खात्यात जमा केली जाईल अशा घोषणा करून थकले आहे.

यावर पीक विमा योजना हा एक उतारा असतो. प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा तर बोजवारा उडाला आहे. महाराष्ट्र सरकारने एक रुपयात पीक विमा जाहीर केला, पण तिचाही बोजवारा उडाला आहे. या दोन्ही योजनांमध्ये महाराष्ट्रातील कोणत्याही शेतकऱ्याला त्याचे हानी इतकी रक्कम किंवा त्याचे समाधान करू शकणारी भरपाई मिळाल्याचे ऐकिवात नाही. तसे वाहता हे अस्मानी-सुलतानी संकट आहे. कोणतेही सरकार कितीही घोषणा करत असले तरी या संकटाला पुरे पडू शकत नाही; परंतु राजकारणी माणसामध्ये खरे बोलण्याची ताकद उरलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी सरकारकडून अपेक्षा न बाळगता काही वेगळ्या उपाययोजना करून या संकटावर मात केली पाहिजे.

## संपादकीय »

### वारसा आरसा!


***श्रीमंतांकडून जमेल तितके काढून घ्यावे आणि जमेल तितके ते गरिबांस वाटावे हा विचार नवा नाही आणि मोदी सरकार त्याबाबत अनभिज्ञ आहे, असेही नाही..***

घुसपैठिये, मंगळसूत्र, अपत्यसंख्या अशा जाज्वल्य विषयांनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर आकारणीसारख्या अभ्यासपूर्ण विषयास हात घेतला हे उत्तम झाले. वास्तविक निवडणुकांचा हंगाम हा काही कर आकारणी, करांचे दर इत्यादी गहन मुद्द्यांवर मौलिक मार्गदर्शनास योग्य नाही. पण काँग्रेसचे सॅम पित्रोदा यांच्या वक्तव्याचे निमित्त झाले आणि पंतप्रधानांनी एकदम आर्थिक धोरण या मुद्द्यालाच तोंड फोडले. अमेरिकेत आहे त्याप्रमाणे भारतातही वारसा कर हवी, . ते त्यांनी अमेरिकेत व्यक्त केले. त्यावर येथे काँग्रेस तुम्हास मरणानंतरही लुटत राहील, असा हल्ला पंतप्रधानांनी चढवला. त्यांच्या मते हा वारसा कर हा श्रीमंतांना लुटण्याचाच एक प्रकार. पंतप्रधानांच्या या टीकेवर आणि या कररचनेवर भाष्य करण्याआधी त्यांच्या टीकेचे स्वागत का ते सांगायला हवे. पंतप्रधानांनी पित्रोदा यांच्या विधानावर सडकून टीका केली .

अमेरिकेच्या सेनेटमध्ये युक्रेन, इस्रायल आणि तैवान या मित्रदेशांना आर्थिक आणि सामग्री स्वरूपात मदत करण्याचा प्रस्ताव मंगळवारी रात्री मोठ्या मताधिक्याने मंजूर झाला. अध्यक्ष जो बायडेन यांच्या दृष्टीने, विशेषत: युक्रेनच्या बाबतीत, हा नैतिक विजय ठरतो.

# बायडेन प्रशासनाचा नैतिक विजय..!

जवळपास सहा महिने युक्रेनच्या मदतीचा प्रस्ताव अमेरिकी काँग्रेसमध्ये – विशेषत: प्रतिनिधिगृहामध्ये लोंबकळत पडला होता. कारण त्या सभागृहात रिपब्लिकनांचे प्राबल्य आहे. त्या रिपब्लिकनांमध्येही डोनाल्ड ट्रम्पसमर्थक ‘अलिप्ततावादी’ सदस्यांचा प्रभाव लक्षणीय होता. या मंडळींनी युक्रेनच्या मदतीचा मुद्दा अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणाशी निगडित केला. मदतीस मान्यता द्यायची, तर त्या बदल्यात डेमोक्रॅट्सकडून प्राधान्याने मेक्सिको स्थलांतरितांविषयी धोरणाबाबत ठोस आश्वासने पदरात पाडायची असा खेळ सुरू झाला. ही रस्सीखेच आटोक्याबाहेर जाऊ लागली, कारण प्रतिनिधिगृहामध्ये रिपब्लिकन नेतेपदी आणि रूढार्थाने सभापतीपदी माइक जॉन्सन ही बरीचशी अपिरिचित व्यक्ती ‘बसवण्या’त आली होती. ट्रम्प आणि ट्रम्पभक्तांच्या मुजोरीला जाब विचारेल, अशी क्षमताच जॉन्सन यांच्यात नव्हती. त्यामुळे युक्रेनला मदत देण्याचा प्रस्ताव प्रतिनिधिगृहाच्या पटलावर चर्चेसाठीही



आणला जात नव्हता. त्यावर मतदानही संभवत नव्हते.अमेरिकेच्या सेनेटची मंजुरी गृहीत धरण्यात आली होती, कारण तेथे डेमोक्रॅट्सचे काठावर बहुमत आहे, शिवाय सेनेटच्या सभापती आणि अमेरिकेच्या उपाध्यक्ष कमला हॅरिस यादेखील डेमोक्रॅट आहेत. पण गेल्या आठवड्यात शनिवारी प्रतिनिधिगृहामध्ये युक्रेनच्या मदतीस मंजुरी मिळाल्यामुळे त्या देशाला मदतीचा मार्ग सुकर झाला होता. रिपब्लिकनांचे काठावर बहुमत असलेल्या या सभागृहाने ३११ विरुद्ध ११२ मतांनी प्रस्तावास मंजुरी दिली. एकूण ९५ अब्ज डॉलरच्या मदतप्रस्तावांना तीन स्वतंत्र ठरावांद्वारे मंजुरी देण्यात आली, त्यात युक्रेन मदतीचा वाटा ६० अब्ज डॉलर इतका आहे. यात १० अब्ज डॉलरची मदत कर्जरूपात देण्याची तरतूद आहे. मदत द्यायचीच, तर ती कर्जरूपाने दिली जावी असा आग्रह ट्रम्प यांनी धरला होता. तो काही प्रमाणात मान्य झाला आहे. मात्र अमेरिकेच्या अध्यक्षांना २०२६नंतर हे कर्ज माफ करण्याचा अधिकारही देण्यात आला आहे. गेल्या ऑक्टोबरपासून युक्रेनला मदत देण्याचा मुद्दा रिपब्लिकनांनी अडवून धरला होता. दोन वर्षांपूर्वी युद्धाला तोंड फुटले त्यानंतरच्या काही काळात रशियाला रोखण्यासाठी युक्रेनचे रक्षण कर्तव्यभावनेने केले पाहिजे, याविषयी परंतु गतवर्षीपासून ट्रम्प पुन्हा सक्रिय झाल्यामुळे कोणत्याच देशाला मदत-बिदत करण्याच्या भानगडीत पडण्याची गरज नाही हा अविचार रिपब्लिकन पक्षात जोर धरू लागला आहे. उत्तर अटलांटिक करार संघटना अर्थात ‘नाटो’च्या बाबतीत ट्रम्प यांनी अलीकडे केलेल्या विधानांतून त्यांची बेजबाबदार अलिप्ततावादी भूमिका अधोरेखित झाली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ‘अमूल’वर मोदींनी भरला होता खटला

## पवार यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर तिखट शब्दात हल्लाबोल केला

। नगर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दहा वर्षांपूर्वी महाराष्ट्रात दुष्काळ पडला असताना आमच्या विनंतीनुसार गुजरातच्या अमूल कंपनीने जनावरांना जगविण्यासाठी चारा पाठवला होता. त्यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी होते. परंतु अमूलने महाराष्ट्रात चारा पाठविल्याने चिडून मोदी यांच्या गुजरात सरकारने अमूलच्या प्रमुखांवर खटला भरला होता.**



महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांच्या जनावरांसाठी चारा पाठविणे हा अमूल कंपनीचा गुन्हा होता का, असा सवाल करीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते शरद पवार यांनी, आज तेच मोदी पंतप्रधान आहेत. त्यांची धोरणे शेतकरीविरोधीच आहेत, असा आरोप केला.माढा लोकसभेचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ करमाळा येथे आयोजित जाहीर सभेत पवार यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर तिखट शब्दात हल्लाबोल केला. या सभेत शिवसेना शिंदे गटाचे करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला. यावेळी ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील हे उपस्थित होते. पवार म्हणाले, महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. त्यावेळी मुक्या जनावरांना जगविण्यासाठी उसाचा वाढा हाच चारा होता. मात्र जनावरे उसाचे वाढे खात नव्हती. त्यामुळे आम्ही विनंती करून गुजरातच्या अमूल कंपनीकडून चारा मागितला. त्यांच्या अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रात येऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली होती. त्यानंतर त्यांनी गुजरातमधून चारा पाठविला होता. परंतु त्यामुळे गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी अमूलच्या प्रमुखांवर खटला भरला असा आरोप पवार यांनी केला.१९७२ साली सोलापूर जिल्ह्यात भीषण दुष्काळ पडला असता पालकमंत्री म्हणून जिल्ह्यात ठिकठिकाणी फिरत होतो. सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील, नामदेवराव जगताप, औदुंबर पाटील, गणपतराव देशमुख, विठ्ठलराव शिंदे यांच्या सहकार्याने आम्ही दुष्काळावर मात करू शकलो, अशी आठवणही पवार यांनी काढली. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांच्या जनावरांसाठी चारा पाठविणे हा अमूल कंपनीचा गुन्हा होता का, असा सवाल करीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते शरद पवार यांनी, आज तेच मोदी पंतप्रधान आहेत. त्यांची धोरणे शेतकरीविरोधीच आहेत, असा आरोप केला.माढा लोकसभेचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ करमाळा येथे आयोजित जाहीर सभेत पवार यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर तिखट शब्दात हल्लाबोल केला. या सभेत शिवसेना शिंदे गटाचे करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला. यावेळी ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील हे उपस्थित होते. पवार म्हणाले, महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. त्यावेळी मुक्या जनावरांना जगविण्यासाठी उसाचा वाढा हाच चारा होता. मात्र जनावरे उसाचे वाढे खात नव्हती. त्यामुळे आम्ही विनंती करून गुजरातच्या अमूल कंपनीकडून चारा मागितला.

### चारा पाठविणे हा अमूल कंपनीचा गुन्हा

» गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी अमूलच्या प्रमुखांवर खटला भरला असा आरोप पवार यांनी केला.१९७२ साली सोलापूर जिल्ह्यात भीषण दुष्काळ पडला असता पालकमंत्री म्हणून जिल्ह्यात ठिकठिकाणी फिरत होतो. सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील, नामदेवराव जगताप, औदुंबर पाटील, गणपतराव देशमुख, विठ्ठलराव शिंदे यांच्या सहकार्याने आम्ही दुष्काळावर मात करू शकलो, अशी आठवणही पवार यांनी काढली.दहा वर्षांपूर्वी महाराष्ट्रात दुष्काळ पडला असताना आमच्या विनंतीनुसार गुजरातच्या अमूल कंपनीने जनावरांना जगविण्यासाठी चारा पाठवला होता. त्यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी होते. परंतु अमूलने महाराष्ट्रात चारा पाठविल्याने चिडून मोदी यांच्या गुजरात सरकारने अमूलच्या प्रमुखांवर खटला भरला होता. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांच्या जनावरांसाठी चारा पाठविणे हा अमूल कंपनीचा गुन्हा होता का, असा सवाल करीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते शरद पवार यांनी, आज तेच मोदी पंतप्रधान आहेत. त्यांची धोरणे शेतकरीविरोधीच आहेत, असा आरोप केला.

# मविआ सरकार फडणवीसांना अटक करणार होतं

## असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे

। अलिबाग । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडीचं सरकार असताना सरकारमधील नेत्यांनी भाजपा नेते देवेंद्र फडणवीस, गिरीश महाजन, आशिष शेलार आणि प्रवीण दरेकर यांना अटक करण्याची योजना आखलेली.**



असा गौप्यस्फोट मविआ सरकारमधील तत्कालीन मंत्री आणि राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीवेळी केला होता. शिंदेंच्या मविआवरील या आरोपांवर मविआ नेत्यांकडून प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. शिवसेनेच्या ठाकरे गटातील राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांनीदेखील यावर प्रतिक्रिया दिली आहे. राऊत म्हणाले, फडणवीसांसह अनेक भाजपा नेते काही गुन्ह्यांमध्ये सहभागी होते. महाविकास आघाडीचं सरकार त्या गुन्ह्यांप्रकरणी तपास करत होतं. अशाच एका प्रकरणात फडणवीसांचा प्रमुख सहभाग होता. त्यामुळे त्यांना वाटू लागलं होतं की, आता आपल्याला अटक होणार आहे. त्यामुळेच त्यांनी मविआ सरकार पाडण्यासाठी पावलं उचलली.दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी केलेल्या दाव्यावर स्वतः फडणवीस यांनीदेखील भाष्य केलं होतं. रायगडमधील सभेत फडणवीस म्हणाले, माझी चौकशी करण्यासाठी त्यांनी काही अधिकारी नेमले, काही अधिकाऱ्यांना त्यांच्या पदावरून हटवलं, माझी चौकशीदेखील झाली.

### नेत्यांवर वेगवेगळे आरोप करत होतात

» त्यात त्यांना काहीच आढळलं नाही.शिंदे आणि फडणवीसांच्या आरोपांवर आता शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, त्या विषयावर मी आता काही बोलत नाही, त्या विषयावर संजय राऊतांनी योग्य उत्तर दिलं आहे. राऊत परवा अत्यंत चांगल्या पद्धतीने त्यावर बोलले आहेत. आज काही वर्तमानपत्रांमध्ये लेख आले आहेत. या लेखांमध्ये गेल्या दोन-तीन दिवसांत यांच्या (महायुती) सरकारने काही नेत्यांना अनेक प्रकरणांमध्ये क्लीन चिट दिली आहे, त्यावर विस्तृतपणे लेखन करण्यात आलं आहे. म्हणजेच ७० हजार कोटी रुपयांचा सिंचन घोटाळा असेल, शिखर बँकेचा घोटाळा असेल, अशा घोटाळ्यांप्रकरणी त्यांनी वेगवेगळ्या लोकांना क्लीन चिट दिल्या आहेत. मग हे घोटाळे झाले होते की नव्हते? हा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणजे कालपर्यंत तुम्ही काही नेत्यांवर वेगवेगळे आरोप करत होतात.

# देशभरात दुसऱ्या टप्प्यात 64.70 टक्के मतदान!

## 89 मतदारसंघात आज दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडलं

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

देशभरातील ८९ मतदारसंघात आज दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडलं. या सर्व मतदारसंघांमध्ये मतदानाची वेळ संपेपर्यंत अर्थात संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सरासरी 64.70 टक्के मतदान झालं. तर यांपैकी महाराष्ट्रात आठ मतदारसंघात 53.71 टक्के मतदान झालं. यामध्ये वर्धा लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक ५६.६६ टक्के मतदानाची नोंद झाली. निवडणूक आयोगानं ही आकडेवारी जाहीर केली आहे. देशातील १३ राज्यांमध्ये एकूण ८९ मतदारसंघांत दुसऱ्या टप्प्यातील मतदान शुक्रवारी २६ एप्रिल रोजी पार पडलं. यासाठी १६ कोटी मतदार पात्र होते, पण त्यांपैकी सुमारे ९ कोटी मतदारांनीच मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये ९ मतदारसंघ हे अनुसुचित जातीसाठी तर ७ मतदारसंघ अनुसुचित जमातीसाठी राखीव होते.



प्रकाश आंबेडकर (अकोला), रवी राणा (अमरावती), रविकांत तुपकर (बुलडाणा), रामदास तडस (वर्धा) यांच्यासह देशभरात ओम बिर्ला, राहुल गांधी, हेमा मालिनी, अरुण गोविल, एच. डी. कुमारस्वामी, शशी थरूर, भूपेश बघेल, के. सी. वेणुगोपाल, दानिश अली या महत्वाच्या उमेदवारांचं भवितव्य ईव्हीएममध्ये कैद झालं आहे.यापूर्वी या टप्प्यात 89 जागांवर मतदान होणार होते, मात्र मध्य प्रदेशातील बैतुल जागेवर बसपाच्या उमेदवाराचा मृत्यू झाल्याने आता या जागेवर 7 मे रोजी निवडणूक होणार आहे. 2019 मध्ये भाजपने या जागांवर सर्वाधिक 50 जागा जिंकल्या होत्या आणि NDA मित्रपक्षांनी 8 जागा जिंकल्या होत्या. कॉंग्रेसला 21 जागा मिळाल्या होत्या. तर, अन्य पक्षांना 9 जागा मिळाल्या होत्या. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात 1,198 उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये 1,097 पुरुष आणि 100 महिला उमेदवार आहेत. एक उमेदवार तृतीयपंथी आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्मने 1,192 उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रात दिलेल्या माहितीचा अहवाल तयार केला. त्यापैकी 21% म्हणजेच 250 उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. 390 म्हणजे 33% उमेदवार करोडपती आहेत. त्यांच्याकडे एक कोटी किंवा त्याहून अधिक किमतीची संपत्ती आहे. सहा उमेदवारांनी त्यांची संपत्ती शून्य घोषित केली आहे, तर तिघांची मालमत्ता 500 ते 1,000 रुपये आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म च्या अहवालानुसार 14 टक्के म्हणजेच 167 उमेदवारांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत. खून, अपहरण यासारख्या गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे. 3 उमेदवारांवर खुनाचा तर 24 जणांवर खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे दाखल आहेत. 25 उमेदवारांवर महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी एकावर बलात्काराचा गुन्हाही दाखल आहे. त्याच वेळी, 21 उमेदवारांवर द्वेषयुक्त भाषणाशी संबंधित गुन्हे दाखल आहेत्याचवेळी राज्यातील एर्नाकुलम मतदारसंघातून भाजपचे उमेदवार डॉ. के.एस. राधाकृष्णन यांच्यावर 211 गुन्हे दाखल आहेत. तिसऱ्या क्रमांकावरील इडुक्की मतदारसंघातील कॉंग्रेसचे उमेदवार डीन कुरियाकोसे यांच्यावर 88 गुन्हे दाखल आहेत. दुसऱ्या टप्प्यातील 1,192 उमेदवारांपैकी 390 म्हणजेच 33 टक्के कोट्यधीश आहेत. त्यांच्याकडे एक कोटी किंवा त्याहून अधिक किमतीची संपत्ती आहे. उमेदवारांची सरासरी मालमत्ता 5.17 कोटी रुपये आहे. सहा उमेदवारांनी त्यांची संपत्ती शून्य घोषित केली आहे, तर तिघांची संपत्ती 300 ते 1,000 रुपये आहे. देड, महाराष्ट्रातील अपक्ष उमेदवार लक्ष्मण नागोराव पाटील यांची एकूण संपत्ती 500 रुपये आहे. कासारगोड, केरळ येथील राजेश्वरी केआर यांनी एकूण 1,000 रुपये आणि अमरावती, महाराष्ट्रातील पृथ्वीसम्राट मुकिंदराव दीपवंश यांनी एकूण 1,000 रुपयांची मालमत्ता जाहीर केली आहे.

### 89 जागांवर मतदान होणार होते

» देशभरातील ८९ मतदारसंघात आज दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडलं. या सर्व मतदारसंघांमध्ये मतदानाची वेळ संपेपर्यंत अर्थात संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सरासरी 64.70 टक्के मतदान झालं. तर यांपैकी महाराष्ट्रात आठ मतदारसंघात 53.71 टक्के मतदान झालं. यामध्ये वर्धा लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक ५६.६६ टक्के मतदानाची नोंद झाली. निवडणूक आयोगानं ही आकडेवारी जाहीर केली आहे.देशातील १३ राज्यांमध्ये एकूण ८९ मतदारसंघांत दुसऱ्या टप्प्यातील मतदान शुक्रवारी २६ एप्रिल रोजी पार पडलं. यासाठी १६ कोटी मतदार पात्र होते, पण त्यांपैकी सुमारे ९ कोटी मतदारांनीच मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये ९ मतदारसंघ हे अनुसुचित जातीसाठी तर ७ मतदारसंघ अनुसुचित जमातीसाठी राखीव होते. प्रकाश आंबेडकर (अकोला), रवी राणा (अमरावती), रविकांत तुपकर (बुलडाणा), रामदास तडस (वर्धा) यांच्यासह देशभरात ओम बिर्ला, राहुल गांधी, हेमा मालिनी, अरुण गोविल, एच. डी. कुमारस्वामी, शशी थरूर, भूपेश बघेल, के. सी. वेणुगोपाल, दानिश अली या महत्वाच्या उमेदवारांचं भवितव्य ईव्हीएममध्ये कैद झालं आहे.यापूर्वी या टप्प्यात 89 जागांवर मतदान होणार होते.

# राहुल यांच्या विधानांबाबत आयोगाची सावध भूमिका

## आयोगाने दोन्ही पक्षांच्या राष्ट्रीय अध्यक्षांना नोटीस बजावली

। नागपूर ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

पंतप्रधान नरेंद्र मोदी व कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्याविरोधात झालेल्या आचारसंहिता भंगाच्या तक्रारीवरून केंद्रीय निवडणूक आयोगाने गुरुवारी दोन्ही पक्षांच्या राष्ट्रीय अध्यक्षांना नोटीस बजावली. २९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत उत्तर देण्याचे निर्देश यात देण्यात आले. मात्र मोदी व गांधी यांना थेट नोटीस बजावणे अपेक्षित असताना पक्षाध्यक्षांना नोटीस पाठवून आयोगाने बचावात्मक पवित्रा घेतल्याची चर्चा आहे.



राजस्थानातील बांसवाडा येथील पंतप्रधानांच्या भाषणाविरोधात कॉंग्रेसने तर केरळच्या कोट्टायममधील राहुल गांधी यांच्या विधानांविरोधात भाजपने निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. या तक्रारींच्या आधारे आयोगाने गुरुवारी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा व कॉंग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना दोन पानी नोटिसा पाठविल्या. विशेष म्हणजे या नोटिसांमध्ये मोदी किंवा गांधी या दोघांच्याही नावांचा उल्लेख केलेला नसून लेखी तक्रारींच्या प्रती जोडण्यात आल्या आहेत. प्रचारसभेतील भाषणांबद्दल प्रमुख प्रचारकच जबाबदार असतील असे नोटिसांमध्ये नमूद करण्यात आले आहे.आवेशपूर्ण भाषण करताना भाषणाची पातळी खालावू शकते. त्यामुळे दक्षता बाळगली पाहिजे, असे आयोगाने म्हटले आहे. एकाबाजूला आयोगाने आक्षेपार्ह भाषणांबद्दल नेत्यांना जबाबदार धरले असले तरी, 'पक्षांना त्यांच्या उमेदवारांच्या आणि विशेषत: प्रमुख प्रचारकांच्या वर्तनाची जबाबदारी घ्यावी लागेल', असेही म्हटले आहे.

### मोदी काय म्हणाले?

» लोकप्रतिनिधी कायद्याच्या अनुच्छेद ७७ नुसार, मोदी व गांधी यांचा त्यांच्या पक्षांनी प्रमुख प्रचारकांच्या यादीत समावेश केला आहे. पक्षाने त्यांच्या भाषणांवर देखरेख ठेवणे अपेक्षित असल्याने पक्षप्रमुखांना नोटीस बजावण्यात आल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे.काही दिवसांपूर्वी भाजपचे पश्चिम बंगालमधील नेते दिलीप घोष यांनी 'तृणमूल कॉंग्रेस'च्या सर्वेसर्वा व राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याबद्दल तर, कॉंग्रेसचे महासचिव रणदीप सुरजेवाला यांनी भाजप उमेदवार हेमा मालिनी यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधाने केली होती. कॉंग्रेसच्या समाजमाध्यम विभाग प्रमुख सुप्रिया श्रीनेत यांच्या 'एक्स' हॅण्डलवरून भाजपच्या हिमाचल प्रदेशमधील मंडी मतदारसंघातील उमेदवार व अभिनेत्री कंगना राणौत यांच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी केली गेली. या तीनही प्रकरणी आयोगाने थेट नेत्यांना नोटीस बजावली होती. मात्र, मोदी व गांधी यांच्या संदर्भातील फक्त पक्षाध्यक्षांना नोटिसा बजावण्यात आल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

# टायगर श्रॉफचा प्रँक पडला त्याच्यावरच भारी



अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ सोशल मीडियावर रोज नवनवीन व्हिडीओज शेअर करून आपला आगामी चित्रपट 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपटाचं प्रमोशन करताना दिसतात. दोन्ही अभिनेत्यांचे हे व्हिडीओज इंटरनेटवर खूप मोठ्या प्रमाणात व्हायरलही होतात. त्यात आज १ एप्रिल म्हणजेच 'एप्रिल फूल'. अशातच टायगरने अक्षय कुमारसाठी चांगल्या प्रँकचं नियोजन केलं आणि अक्षयला खूप मोठा 'एप्रिल फूल' केला. या व्हिडीओत व्हॉलीबॉल गेम सुरू करण्याच्या आधी टायगर एका कोल्ड ड्रिंकच्या बाटलीला जोरात हलवून ती ठेवून देतो आणि सगळ्यांना खेळायला बोलावतो. अक्षयची एन्ट्री होताच टायगर त्याला ती बाटली उघडून द्यायला सांगतो. बाटली उघडताच कोल्ड ड्रिंकमध्ये जमा झालेला फेस अक्षयच्या तोंडावर उडतो. नंतर अक्षय हसत हसत सगळ्यांवर कोल्ड ड्रिंक उडवतो. या प्रँकला 'एप्रिल फूल'चं गाणं जोडत टायगरनं अक्षयला चांगलंच 'फूल' बनवल्याचं या व्हिडीओत पाहायला मिळतंय. "एप्रिल फूल बडे मियाँ" असं कॅप्शन या व्हिडीओला टायगरनं दिलं आहे. टायगर आणि अक्षयचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खूप मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत आपल्या प्रतिक्रिया शेअर केल्या आहेत. 'खिलाडीबरोबरच खिलवाड', 'छोटे मियाँनं बदला घेतला' अशा अनेक कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत.दरम्यान, 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपटाबद्दल सांगायचं झालं, तर हा चित्रपट ईदच्या मुहूर्तावर म्हणजेच १० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार आहे. अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ सोशल मीडियावर रोज नवनवीन व्हिडीओज शेअर करून आपला आगामी चित्रपट 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपटाचं प्रमोशन करताना दिसतात. दोन्ही अभिनेत्यांचे हे व्हिडीओज इंटरनेटवर खूप मोठ्या प्रमाणात व्हायरलही होतात.या व्हिडीओत व्हॉलीबॉल गेम सुरू करण्याच्या आधी टायगर एका कोल्ड ड्रिंकच्या बाटलीला जोरात हलवून ती ठेवून देतो आणि सगळ्यांना खेळायला बोलावतो.

# आलियाच्या लग्नात पळवले होते रणबीरचे शूज

रणबीर कपूर आणि आलिया भट्ट यांची जोडी बॉलीवूडमध्ये कायम चर्चेत असते. एकमेकांना अनेक वर्षे डेट केल्यावर या जोडीने १४ एप्रिल २०२२ मध्ये लग्नगाठ बांधली. डेस्टिनेशन वेडिंग करण्यापेक्षा आलिया-रणबीरने घरच्या घरी लग्न करण्यास पसंती दर्शवली. या दोघांच्या लग्नाला फक्त जवळचे नातेवाईक उपस्थित होते. लग्न समारंभातील प्रथेनुसार वधूच्या बहिणी नवऱ्या मुलाच्या चपला किंवा शूज पळवतात व त्यानंतर भेटवस्तू मागतात. रणबीरच्या लग्नात आलियाच्या बहिणींनी शूज पळवल्यावर अभिनेत्याने त्याच्या मेव्हणीला ११ ते १२ कोटी रुपये दिले होते अशा चर्चा तेव्हा सर्वत्र रंगल्या होत्या. याबाबत रणबीरने कपिल शर्माच्या शोमध्ये खुलासा केला आहे. रणबीर कपूर, त्याची आई नीतू व बहीण रिद्धिमा यांनी नुकतीच 'द ग्रेट इंडियन कपिल शो' या कार्यक्रमात उपस्थिती लावली होती. यावेळी कपिलने रणबीरला लग्नात या शूज पळवण्याच्या विधीबद्दल विचारलं.कपिल म्हणाला, "आम्ही असं ऐकलंय की, तुमच्या लग्नात आलियाच्या बहिणींनी तुझे शूज चोरले होते आणि ते परत घेण्यासाठी तू मेव्हणीला ११ ते १२ कोटी दिलेस हे खरं आहे का?" यावर रणबीर म्हणाला, "आलियाच्या कोणत्याही बहिणीने माझ्याकडे एवढे कोटी रुपये वगैरे मागितले नाहीत. त्यांनी शूज चोरल्यावर काही लाखांची मागणी केली होती. पण, मी त्यांच्याबरोबर बार्गेनिंग करून त्यांना काही हजारांवर आणलं आणि तेवढेच पैसे मी त्यांना दिले होते.""आमचं लग्न तसंही घरच्या घरी झालं होतं. त्यामुळे जरी त्यांनी मला शूज दिले नसते, तरीही ते घरीच राहिले असते. मी पण घरी असाच राहिलो असतो." असं मजेशीर उत्तर रणबीर कपूरने दिलं. दरम्यान, आलिया भट्ट व रणबीर कपूर आता सुखी वैवाहिक आयुष्य जगत आहेत. २०२२ च्या एप्रिलमध्ये लग्नगाठ बांधल्यावर ६ नोव्हेंबर २०२२ रोजी अभिनेत्रीने गोंडस लेकीला जन्म दिला. या जोडप्याची लेक राहा सुद्धा आता सोशल मीडियावर चांगलीच लोकप्रिय झाली आहे. लवकरच ही जोडी 'ब्रह्मास्त्र' चित्रपटाच्या दुसऱ्या भागात एकत्र झळकणार आहे.रणबीर कपूर आणि आलिया भट्ट यांची जोडी बॉलीवूडमध्ये कायम चर्चेत असते. एकमेकांना अनेक वर्षे डेट केल्यावर या जोडीने १४ एप्रिल २०२२ मध्ये लग्नगाठ बांधली. डेस्टिनेशन वेडिंग करण्यापेक्षा आलिया-रणबीरने घरच्या घरी लग्न करण्यास पसंती दर्शवली.



# पूजा रोहन ला करतेय डेट?

अभिनेत्री पूजा हेगडे बॉलीवूड आणि दाक्षिणात्य इंडस्ट्रीमधून जगभरात आपली ओळख निर्माण केली. आपल्या व्यावसायिक आयुष्याबाबत जेवढी ती उघडपणे बोलते तितकंच आपलं वैयक्तिक आयुष्य तिला खासगी ठेवायला आवडतं. अशातच पूजा हेगडे तिच्या कथित बॉयफ्रेंड रोहन मेहराबरोबर पुन्हा एकदा दिसली. वांद्रे येथे एकत्र फिरताना पापाराझींनी त्यांचे फोटोज काढले, त्या वेळेस दोघंही एकाच कारमध्ये होते. यावेळी पूजानं सफेद रंगाचा शर्ट, ग्रे ट्राउजर व काळे बूट घातले होते; तर रोहननं काळ्या रंगाचा टी-शर्ट, निळी पॅन्ट व सफेद शूज, असा कॅज्युअल लूक केला होता. पूजा हेगडे गेल्या काही दिवसांपासून रोहनला डेट करीत असल्याची चर्चा सुरू आहे. रोहन दिवंगत अभिनेते विनोद मेहरा यांचा मुलगा आहे. रोहननं २०१८ मध्ये सैफ अली खानबरोबर 'बाजार' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. रोहनचं नाव याआधी तारा सुतारियाबरोबर जोडलं गेलं होतं. तथापि, मे २०१९ मध्ये दोघे विभक्त झाल्याची माहिती समोर येऊ लागली.२०२३ मध्ये पूजा एका क्रिकेटरला डेट करत आहे आणि लवकरच ती त्याच्याशी लग्न करणार आहे अशा चर्चांना उधाण आलं होतं. तथापि, 'द फ्री प्रेस जर्नल'नं दिलेल्या वृत्तानुसार, अभिनेत्रीनं या अफवा खोडून काढल्या आणि जाहीर केलं की, त्या खोट्या आहेत.दरम्यान, पूजाच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर पूजा सलमान खानबरोबर 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटामध्ये शेवटची दिसली होती. फरहाद सामजी दिग्दर्शित या चित्रपटात व्यंकटेश दग्गुबती, जगपती बाबू, भूमिका चावला, विजेंदर सिंग, अभिमन्यू सिंग, राघव जुयाल, सिद्धार्थ निगम, जस्सी गिल, शहनाज गिल, पलक तिवारी व विनाली भटनागर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# जिजाजींना नाही आणलं का?

अदिती राव हैदरीने अभिनेता सिद्धार्थबरोबर साखरपुडा केला आहे. साखरपुड्यानंतर पहिल्यांदाच शनिवारी ती मुंबई विमानतळावर दिसली. सिद्धार्थशी साखरपुडा केल्यानंतर पहिल्यांदाच ती सार्वजनिक ठिकाणी दिसली. अदितीने एअरपोर्ट लूकसाठी डेनिम शर्टसह लेयर्ड को-ऑर्डर सेट घातला होता. ती खूप छान दिसत होती. यावेळी एका पापाराझीने तिला सिद्धार्थबद्दल विचारलं. त्यावर अदिती लाजताना दिसली. अदितीला पापाराझीने सिद्धार्थबद्दल विचारलं. "सरांना नाही आणलं का? माफ करा, जिजाजींना नाही आणलं का?" असं विचारल्यावर अदिती लाजत हसू लागली. नंतर तिने सांगितलं की सिद्धार्थ तिच्याबरोबर आला नसून कामानिमित्त दुसरीकडे गेला आहे.



# अंकिताच्या लग्नात अमृताने लक्ष वेधून घेतलं

रणदीप हुड्डा दिग्दर्शित 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपट आता प्रेक्षकांना मराठीत पाहता येणार आहे. या चित्रपटाच्या मराठी प्रीमियरला अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली होती. यामध्ये रणदीप हुड्डासह अभिनेत्री अंकिता लोखंडे प्रमुख भूमिकेत झळकली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पत्नी यमुनाबाई सावरकर यांची भूमिका अंकिताने साकारली आहे. या चित्रपटाच्या मराठी स्क्रिनिंगला अमृता



खानविलकरने देखील खास उपस्थिती लावली होती. अंकिता आणि अमृता या दोघीही गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकींच्या घट्ट मैत्रिणी आहेत. अमृता याआधी लाडक्या मैत्रिणीला पाठिंबा देण्यासाठी 'बिग बॉस'च्या घरात देखील पोहोचली होती. याशिवाय अंकिताच्या लग्नात सुद्धा अमृताने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपटाच्या नुकत्याच पार पडलेल्या प्रीमियर शोला सुद्धा तिने हजेरी लावली होती.चित्रपट पाहिल्यावर अमृताने रणदीपसह अंकिताचं कौतुक करण्यासाठी खास पोस्ट शेअर केली आहे. अभिनेत्री लिहिते, "'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट मराठीत पाहण्याची संधी मिळाली.

# पंजाबने केकेआरविरुद्ध 262चे लक्ष्य केलं पार!

## पंजाबने आयपीएल स्पर्धेत 8 विकेट्स राखून मिळवला विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात धावांचा पाठलाग करतानाचा नवा विक्रम रचत पंजाब किंग्ज संघाने कोलकाता नाईट रायडर्स संघाविरुद्ध ऐतिहासिक विजय साकारला. इडन गार्डन्सच्या मैदानावर चौकार-षटकारांची लयलूट झालेल्या लढतीत कोलकाताने २६१ धावांचा डोंगर उभारला. पंजाबच्या फलंदाजांनी वादळी खेळी रचत अशक्यप्राय वाटणारा विजय साकारला. पंजाबने ८ चेंडू आणि ८ विकेट्स राखून संस्मरणीय विजय मिळवला. कोणत्याही ट्वेन्टी२० स्पर्धेत धावांचा पाठलाग करतानाची ही सर्वोत्तम धावसंख्या आहे. या सामन्यात विक्रमी ४२ षटकारांची लयलूट झाली. दोन्ही संघांनी मिळून ५२३ धावा चोपल्या.**



शतकवीर जॉनी बेअरस्टोने या विजयाचा पाया रचला. प्रभसिमरन सिंग, रायली रुसो आणि शशांक सिंग यांनी बेअरस्टोला तोलामोलाची साथ देत थरारक विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. बेअरस्टोने ४८ चेंडूत १०८ धावांची नाबाद खेळी साकारली. शशांक सिंगने २८ चेंडूत नाबाद ६८ धावांची अविश्वसनीय खेळी साकारली. पंजाबने प्रयोग सुरू ठेवत जॉनी बेअरस्टोच्या बरोबरीने प्रभसिमरन सिंगला सलामीला पाठवलं. हा प्रयोग यशस्वी ठरला. प्रभसिमन-बेअरस्टो जोडीने पॉवरप्लेमध्येच ९३ धावांची तडाखेबंद सलामी दिली. प्रभसिमरनने १८ चेंडूतच अर्धशतक पूर्ण केलं. सुनील नरेनच्या अचूक धावफेकीमुळे प्रभसिमरन बाद झाला. त्याने २० चेंडूत ४ चौकार आणि ५ षटकारांसह ५४ धावांची खेळी केली. प्रभसिमरन बाद झाल्यानंतर रायली रुसोने बेअरस्टोला चांगली साथ दिली. संघातून वगळल्यानंतर कसून सराव केलेल्या बेअरस्टोने चौकार, षटकारांची आतषबाजी केली. बेअरस्टो-रुसो जोडीने दुसऱ्या विकेटसाठी ३९ चेंडूत ८५ धावा रचल्या. सुनील नरेनने रुसोला माघारी परतावलं. त्याने १६ चेंडूत २६ धावा केल्या.रुसोच्या जागी आलेल्या शशांक सिंगने पहिल्या चेंडूपासून केकेआरच्या गोलंदाजांना पिटाळून लावलं. एकामागोमाग एक षटकार लगावत शशांकने धावगतीचं दडपण खाली आणलं. बेअरस्टोनं ४५ चेंडूत शतक साजरं केलं. प्रचंड उकाडा आणि आर्द्रता अशा वातावरणातही बेअरस्टोने शतक झळकावलं. या स्पर्धेतलं बेअरस्टोचं हे दुसरं शतक आहे. शशांक सिंगने २८ चेंडूत २ चौकार आणि ८ षटकारांसह नाबाद ६८ धावा करत पंजाबच्या स्वप्नवत विजयावर शिक्कामोर्तब केलं. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ३७ चेंडूत ८४ धावा कुटल्या. तत्पूर्वी २२ चौकार आणि १८ षटकारांच्या बळावर कोलकाता नाईट रायडर्स संघाने २६१ धावांचा डोंगर उभारला. फिल सॉल्ट आणि सुनील नरेन यांनी १३८ धावांची खणखणीत सलामी दिली. या जोडीने पंजाबच्या गोलंदाजांच्या ठिकऱ्या उडवल्या. शतकाकडे वाटचाल करणाऱ्या नरेनची खेळी राहुल चहरने संपुष्टात आणली. त्याने ३२ चेंडूत ९ चौकार आणि ४ षटकारांसह ७१ धावांची खेळी केली. विकेटकीपिंग आणि सलामी अशा दोन्ही भूमिका निभावणाऱ्या सॉल्टने पॉवरप्लेनंतरही फटकेबाजी सुरुच ठेवली. सॅम करनच्या गोलंदाजीवर चौकार-षटकारांची लयलूट केल्यानंतर एका सुरेख यॉर्करवर तो त्रिफळाचीत झाला. त्याने ३७ चेंडूत ६ चौकार आणि ६ षटकारांसह ७५ धावा चोपल्या.चौथ्या क्रमांकावर बढती मिळालेल्या व्यंकटेश अय्यर पर्याय? ... 

### बेअरस्टोने या विजयाचा पाया रचला

» कर्णधार श्रेयस अय्यर आणि वेंकटेश अय्यर जोडीने चौथ्या विकेटसाठी १८ चेंडूत ४३ धावा जोडल्या आणि कोलकाताने अडीचशेचा टप्पा ओलांडला. धावबाद होण्यापूर्वी वेंकटेशने २३ चेंडूत ३९ धावांची खेळी केली. श्रेयसने १० चेंडूत २८ धावा कुटल्या. कोलकाता एकाक्षणी तीनशेचा टप्पा ओलांडणार असं चित्र होतं पण पंजाबच्या गोलंदाजांनी चांगलं पुनरागमन केलं. पंजाबकडून अर्शदीपने २ तर सॅम करन, हर्षल पटेल, राहुल चहर यांनी प्रत्येकी एक विकेट पटकावली.शतकवीर जॉनी बेअरस्टोने या विजयाचा पाया रचला. प्रभसिमरन सिंग, रायली रुसो आणि शशांक सिंग यांनी बेअरस्टोला तोलामोलाची साथ देत थरारक विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

# काव्या मारनला राग अनावर!

## हैदराबादला 35 धावांनी पराभवाचा सामना करावा लागला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**इंडियन प्रीमिअर लीग २०२४ मध्ये गुरुवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबादमध्ये ४१ वा सामना खेळला गेला. या सामन्यात सनरायझर्स हैदराबादला ३५ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. पण, या विजयासह आरसीबीने एसआरएचकडून मागील पराभवाचा बदला घेतला. या सीझनमधील दुसरा विजय मिळाल्याने स्टार खेळाडू विराट कोहली खूप आनंदात होता. मात्र, दुसरीकडे सनरायझर्स हैदराबादची मालकीण काव्या मारन सामन्यादरम्यान चांगलीच संतापलेली दिसली. तिच्या रागावलेल्या चेहऱ्यावरील वेगवेगळ्या रिॲक्शनचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**




हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सामना सुरू होण्यापूर्वी एसआरएच संघ विजयाचा प्रबळ दावेदार मानला जात होता. त्याने आरसीबीविरुद्धच्या मागील सामन्यात आयपीएलच्या इतिहासातील सर्वाधिक धावसंख्या नोंदवून इतिहास रचला. तेव्हा एसआरएचची मालकीण काव्या मारन खूप खूश होती. पण, मॅच जस-जशी पुढे गेली तस- तसे तिच्या चेहऱ्यावरचं हसू गायब झाले. आरसीबीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर विराट कोहली आणि रजत पाटीदार यांच्या अर्धशतकांच्या जोरावर स्कोरबोर्डवर २०६ धावा नोंदवल्या, यावेळी एसआरएच संघाची मालकीण काव्या मारन आनंदी दिसत होती, कारण तिच्या संघाची फलंदाजी अजून बाकी होती. या आयपीएलमध्ये विक्रम नोंदवणारे सनरायझर्सचे फलंदाज आरसीबीच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यात यशस्वी होतील असा तिचा विश्वास होता, पण क्रिकेटमध्ये कधी काय होईल हे कोणालाच माहीत नसते. यामुळे आरसीबीविरुद्धच्या मागील सामन्यात आनंदाने उड्या मारणारी काव्या यावेळी मात्र चांगली संतापलेली दिसली. सनरायझर्सच्या एकामागोमाग विकेट पडल्यानंतर जेव्हा जेव्हा कॅमेरा तिच्याकडे जायचा, तेव्हा ती खूप चिडलेली आणि संतापलेली दिसत होती. सोशल मीडियावर तिचा एक व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. यामध्ये सनरायझर्स हैदराबादचा फलंदाज अब्दुल समाद आऊट होताच कॅमेऱ्याचा फोकस काव्या मारनवर गेला, यावेळी ती अतिशय रागावलेली दिसत होती. तिने हातवारे करून खेळाडूंवर आपला राग व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. जेव्हा जेव्हा एसआरएचचे फलंदाज बाद झाल्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतत होते.

### पाटीदारने 5 षटकार लगावले

» तेव्हा तेव्हा ती खूप तणावात दिसली. तिच्या चेहऱ्यावर तो तणाव अगदी सहज दिसून येत होता.आरसीबीने प्रथम फलंदाजी करत एसआरएचला २०७ धावांचे लक्ष्य दिले. विराट कोहलीने ४३ चेंडूत ५१ धावांची खेळी केली, तर रजत पाटीदारने आपल्या खेळाने सर्वांचे मन जिंकले. उजव्या हाताच्या या फलंदाजाने २० चेंडूत ५० धावांची जलद खेळी केली. यावेळी पाटीदारने ५ षटकार आणि २ चौकार लगावले.